महा मेट्रो

PUNE METRO

डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौकातून पुण्याच्या दिशेला जाणारे वाहतुकीचे नियमनाबाबत .

पुणे , २६ जुलै २०१८ : डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक हा पिंपरी चिंचवड परिसरातील गजबजलेला चौक असून , सर्व प्रकारची आंदोलने , मोर्चे , धरणे , सभा इत्यादी सामाजिक व राजकीय कार्यक्रम सदर चौकामध्ये सतत होत असतात .

डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक ते खराळवाडी येथील ग्रेड सेपरेटर मर्ज इन पर्यंतच्या सर्व्हिस रस्त्याचे रुंदीकरण १५० मीटर लांब व ४ मीटर रुंदीचे काँक्रीट करून वाहतूक सेवा रस्त्यावरून सुरु केली आहे . या ठिकाणी रस्त्याचे साइडपट्टीचे काम महा मेट्रोकडून करण्यात आलेले आहे . या ठिकाणी महामेट्रोतर्फे १ इन्स्पेक्टर ग्रेड- १ , व ३ ट्रॅफिक मार्शल नेमण्यात आले असून कोणतेही वाहन सदर रस्त्यावर थांबू ने देणे बाबत त्यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत . तसेच वाहतूक सुरळीत पार पडण्याकरीता पिंपरी वाहतूक शाखे मार्फत सदर रस्त्यावर वाहन थांबल्यास दंडात्मक कारवाई सातत्याने करण्यात येत आहे .

या व्यतिरिक्त डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक ते खराळवाडी मर्ज इन पर्यंत सेवा रस्त्यावरील सर्व खड्डे हे महामेट्रो कडून काँक्रीटने बुजविण्यात आले आहेत .